## निशाणी क्र. १४ वरील आदेश

(CNR No. MHSO05-000760-2018)

सदरचा आदेश मी या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर पुन्हा नमूद करण्याचे कारण नाही.

२. सदर अर्जास सामनेवाले क्र. २ व ६ यांनी वादाचे म्हणणे निशाणी क्र. १९ प्रमाणे दिले आहे, ते खालीलप्रमाणे.

अर्ज खोटा आणि बेकायदेशीर आहे. ज्या उपविभागीय अधिकाऱ्यांविरुद्ध दाद मागितली आहे, ते याकामी पक्षकार नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध आदेश पारित करता येणार नाही. सर्व दावामिळकती सामनेवाला क्र. १ च्या स्वकष्टार्जित असल्याचे पुराव्याने सिद्ध झाले आहे. त्यांना सामनेवाले क्र. २ व ६ यांनी करुन दिलेली खरेदीखते कायदेशीर आहेत. सामनेवाले क्र. २ व ६ यांनी स्वतः सदर मिळकती खरेदी केल्या आहेत. त्यांची नावे लागली आहेत, त्यामुळे त्या जमिनींचा मोबदला घेण्याचा हक्क व अधिकार या सामनेवाल्या क्र. २ व ६ यांना आहे. या न्यायालयास हा अर्ज चालविण्याची न्यायाधिकारिता नाही. हा अर्ज मंजूर झाल्यास नसलेला हक्क अपिलार्थींना देऊन, अपिलाच्या सुनावणीपूर्वीच न्यायनिर्णय केल्यासारखे होईल, म्हणून हा अर्ज फेटाळावा.

३. वरीलप्रमाणे अर्ज निशाणी क्र. १४ पाहिला. वादाचे म्हणणे निशाणी क्र. १९ पाहिले. प्रकरण पाहिले. विद्वान वकिलांचा प्रदीर्घ युक्तिवाद ऐकला.

४. सदर प्रकरणी जी खरेदीखते अपिलार्थी आव्हानित करु इच्छितो आहे व जे खरेदीखत या अपिलार्थींचा हक्क बुडविण्यासाठी, अधिकार डावलण्यासाठी, हिस्सा बुडविण्यासाठी सामनेवाला क्र. १ याने सामनेवाले क्र. २ व ६ यांना बेकायदेशीरपणे करुन दिल्याचे अपिलार्थींचे म्हणणे आहे, ते खरेदीखत दिनांक ०७.०१.२००९ रोजीचे आहे. दावामिळकतींच्या भूसंपादनाची अधिसूचना या अपिलार्थींच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक ११.१२.२०१६ रोजीच्या 'दैनिक लोकमत'

या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली आहे.

५. या कथनांवरुन, पुढे भविष्यात जवळपास ७ वर्षांनंतर होणाऱ्या जमीन अधिग्रहणातील मोबदल्याचा हक्क डावलण्यासाठी सामनेवाला क्र. १ याने सामनेवाले क्र. २ व ६ यांना दावामिळकतींचे हस्तांतरण करुन दिले, हे मुळीच स्वीकारार्ह वाटत नाही. थोडक्यात, दावामिळकतींचे हस्तांतरण दिनांक ०७.०१.२००९ रोजी झाले, त्यामुळे पुढे भविष्यात दावामिळकतींचे अधिग्रहण ७ वर्षानंतर किंवा कधीही होणार असल्याचे सामनेवाला क्र. १ यास त्यावेळी माहिती होण्याचे दूरदूरपर्यंत काहीच कारण नव्हते.

६. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, दिनांक ०७.०१.२००९ रोजी झालेल्या हस्तांतरणावरुन या अपिलातील अपिलार्थींनी लगेच कधी कुठली कार्यवाही केल्याचे दिसत नाही. ज्या वादग्रस्त न्यायनिर्णयावरुन दावा दाखल करण्यात आला आहे, तो देखील २०१२ सालीच दाखल करण्यात आला आहे. त्या दाव्यात देखील दावामिळकतींच्या प्रस्तावित अधिग्रहणाबाबत कथन नाही. या अपिलात आणि या अर्जात देखील भूसंपादन अधिकारी यांना पक्षकार केलेले नाही, त्यांना फर्मान पाठवावे, अशीही मागणी नाही. थोडक्यात, या अपिलार्थींचा हक्क डावलण्यासाठी वादग्रस्त हस्तांतरण झाले असल्याचे धरण्यास या क्षणी काही आधार नाही. त्यामुळे हा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

*सही/-...*

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)

दिनांक : १८.०१.२०१९. जिल्हा न्यायाधीश-३, पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

a) Name of the Stenographer : Mahesh Arjun Kore [Steno (H.G.)]

b) Court : District Judge-3, Pandharpur.

c) Order signed by P. O. : 18/01/2019.

d) Order uploaded on : 24/01/2019.

नि.दि.अ. क्र. ९२/२०१८.
निशाणी क्र. २५